MHST090002082000

## नि.दि.दा.क्र. ३६/२०१२ मधील निशाणी क्र. २९७ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज जादा सरतपास दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी, प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रस्तुत कामी वादीतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक १७७ ला सादर करण्यात आले आहे. त्यांचा अदयाप उलटतपास सुरु झालेला नाही. सरतपास देते वेळी पूर्वीच्या वकीलांकडून सविस्तर महत्वाच्या बाबी नमूद करायच्या राहून गेल्यामुळे जादा सरतपास देणे आवश्यक आहे असे या वादींचे म्हणणे आहे. त्याबाबत ज्यादा सरतापास त्याने दिल्यास प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. तसेच अशा प्रकारची परवानगी दिल्यास वाद मुद्दयांचे निराकरण गुणावगुणावर होणार आहे. परंतु वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक २१/०६/२०१६ रोजी दिले आहे. सदरचा दावा हा १० वर्षांहून जुना असल्याने वादीने सदर विलंबाकरीता खर्चाची रक्कम देणे योग्य व न्यायोचित होईल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब मी खालील

आदेश पारित करत आहेः

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (रु. पाचशे फक्त) सरकार जमा करावी.

३. वरील प्रमाणे पुर्तता केल्यावर वादींना जादा सरतपास देण्याची परवानगी देण्यात येते.

स्थळ : कोरेगाव (ए.ए.पाचरणे)
दिनांक : ३०/०१/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.